हजेरी सहाय्यकांकडून दाखल करण्यात आलेल्या न्यायालयीन प्रकरणी उपायुक्त (रोहयो) व उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत......

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः न्यायप्र - २०१७/प्र.क्र.११७/मग्रारो-३
१६ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १९ नोव्हेंबर, २०१९.

वाचा :-

शासन परिपत्रक नियोजन विभाग क्रमांकः न्यायप्र-२०१७/प्र.क्र.११७/मग्रारो-३, दि.२६.०९.२०१७

शुध्दीपत्रक :-

नियोजन विभागाच्या (रोहयो) वाचा येथे नमूद दिनांक २६.०९.२०१७ च्या शासन परिपत्रकामधील प्रस्तावना खालीलप्रमाणे वाचण्यात यावी :-

हजेरी सहाय्यकांकडून राज्यातील विविध न्यायालये / न्याधिकरणात दाखल करण्यात आलेल्या / येणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाच्यावतीने संबंधित न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी दिनांक ३.११.१९९५ च्या शासन निर्णयान्वये प्राधिकृत करण्यात आलेले उपजिल्हाधिकारी (रोहयो), सहायक आयुक्त (रोहयो) यांच्याऐवजी न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या / येणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांत उपायुक्त (रोहयो) यांनी शासनाच्यावतीने स्वत: शपथपत्र दाखल करणे आवश्यक राहिल.

२. नियोजन विभागाच्या (रोहयो) वाचा येथे नमूद दिनांक २६.०९.२०१७ च्या शासन परिपत्रकामधील परिच्छेद क्र.३ व ४ खालीलप्रमाणे वाचण्यात यावेत :-

हजेरी सहायकांच्या संबंधित न्यायलयीन प्रकरण दाखल झाल्यास शासनाच्यावतीने न्यायालयात (मा. सर्वोच्च न्यायालय / मा. उच्च न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / औद्योगिक न्यायालय / कामगार न्यायालय) शपथपत्र दाखल केले आहे किंवा कसे याचा आढावा घेऊन विहित मुदतीत परिच्छेदनिहाय अभिप्राय / शपथपत्र न्यायालयात सादर करण्याची दक्षता संबंधित उपायुक्त (रोहयो) यांनी घ्यावी व त्याअनुषंगाने होणाऱ्या प्रत्येक सुनावणीस स्वत: हजर राहणे अनिवार्य राहिल.

३. उक्त दिनांक २६.०९.२०१७ च्या शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. ७ हा खालीलप्रमाणे वाचण्यात यावा :-

काही प्रकरणात मा. मुख्य सचिव / प्रधान सचिव (रोहयो) / सचिव (रोहयो) यांना नावाने प्रतिवादी करण्यात येते मात्र हजेरी सहायकांची सर्व माहिती संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय उपलब्ध असल्याने, अशा प्रकरणी (Su

Motto) संबंधित उपायुक्त (रोहयो) यांनी सदरची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून मा. मुख्य सचिव /प्रधान सचिव (रोहयो) / सचिव (रोहयो) यांचे नाव प्रतिवादी म्हणून वगळण्याची विनंती अतिरिक्त सरकारी वकील / सादरकर्ता अधिकारी यांचेमार्फत न्यायालयास सादर करणे आवश्यक राहिल. त्यासाठी विभागाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. तसेच नाव वगळण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती विभागास कळविण्याची जबाबदारी उपायुक्त (रोहयो) यांची राहिल. अशाप्रकरणी कार्यवाही करण्यास विलंब झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित उपायुक्त (रोहयो) यांची राहिल.

४. संदर्भाधीन दिनांक २६.०९.२०१७ च्या शासन परिपत्रकातील उर्वरित अटी व शर्तीचे पालन करणे अनिवार्य राहिल.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

(एकनाथ डवले)
सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
४. प्रधान सचिव (ग्रा.वि. व पं.रा.), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
५. प्रधान सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
७. सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
८. सचिव (वि.सु.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
९. सर्व विभागीय आयुक्त.
१०. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)
११. सर्व उप आयुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय.
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१३. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई शहर व उपनगर वगळून).
१४. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
१५. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
१८. सर्व उप सचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग), मंत्रालय, मुंबई ६ ३२.
१९. सारसंग्रहासाठी, मग्रारो-१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.